# तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य

३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्रमांक १९६७, मुंबई ४०० ००१.
दूरध्वनी २२६१७९६९ फॅक्स — २२६९०००७
E-mail : mcm.dte@gmail.com Internet : http://www.dte.org.in


संकेतस्थळ : परिपत्रक

का.क्र.१८/तंशिसं/संस्था-पत्र/२०१६/१९५
दिनांकः- १७/११/२०१६

प्रति,

सर्व प्राचार्य / संचालक /अधिष्ठाता
पदविका,पदवी व पदव्युत्तर पदवी व तत्सम संस्था व
त्यामध्ये शिक्षण घेणारे अल्पसंख्यांक विद्यार्थी

विषय :- **केंद्र व राज्य शासनाच्या अल्पसंख्यांक शिष्यवृत्ती योजने बाबत....**

सर्व संस्था / अल्पसंख्यांक विदयार्थ्यांना कळविण्यात येते की,

- **केंद्र शासनाची गुणवत्ता - नि -साधन शिष्यवृत्ती (मेरीट - कम - मिन्स) योजना**
  (**National Scholarship Portal,** संकेत स्थळः www.scholarships.gov.in)

  व

- **राज्य शासनाची अल्पसंख्याक शिष्यवृत्ती योजना**
  (संकेत स्थळः www.dtemaharashtra.gov.in/scholarships)

संबंधीत अल्पसंख्यांक शिष्यवृत्ती योजनेच्या जाहिरातीनुसार विद्यार्थ्यांकडून संबंधीत सांकेतिक स्थळाव्दारे ऑनलाईन अर्ज मागवून संस्थेकडून ऑनलाईन तपासणी करुन मंजूर/नामंजूर करण्यात येते, त्याची तपशीलवार यादी संस्थेला (त्यांच्या लॉगिन आयडी व त्यांना देण्यात आलेल्या पासवर्ड व्दारे लॉगिन करुन) **Institute Panel** च्या अंतर्गत देण्यात येते व शिष्यवृत्ती मंजुर झालेल्या विद्यार्थ्यांची अंतिम यादी संस्थांना व विद्यार्थ्यांना संकेत स्थळाव्दारे उपलब्ध होते.

या कार्यालयाकडून एकदा शासननिर्णयाप्रमाणे अल्पसंख्यांक शिष्यवृत्ती [ केंद्रशासनाची गुणवत्ता-नि-साधन शिष्यवृत्ती (**Merit-cum-Means**) / राज्यशासनाची अल्पसंख्यांक शिष्यवृत्ती ] मंजूर झाल्यानंतर व शिष्यवृत्ती योजनेची रक्कम सरळ विद्यार्थ्यांच्या खात्यामध्ये जमा होत असल्याकारणाने कोणत्याही परिस्थितीत अल्पसंख्यांक शिष्यवृत्ती रद्द करता येणार नाही.

जर विद्यार्थ्यांना इतर कोणतीही शासकीय शिष्यवृत्ती / सवलत मंजूर करण्यात आली असेल / करण्यात येईल (जसे ईबीसी / सामाजिक न्याय विभाग, आदिवासी विकास विभाग कडून इ.) तर संस्थेने त्या विद्यार्थ्यांचे नाव त्या योजनेतुन रद्द करण्याबाबत संबंधीत कार्यालयास न चुकता कळविण्यात यावे, याची संबंधित संस्थेने नोंद घ्यावी.

**शासनाच्या धोरणानुसार विद्यार्थी एकाच शासकीय योजनेचा लाभ घेऊ शकतो, जर विद्यार्थी एका पेक्षा अधिक शासकीय योजनेचा लाभ घेत असेल तर त्या संबंधित संस्थेला जबाबदार धरण्यात येईल.**

( डॉ. सुभाष महाजन )
संचालक,
तंत्रशिक्षण संचालनालय, म. रा. मुंबई.

प्रत :-१. सहसंचालक, तंत्र शिक्षण विभागीय कार्यालये, मुंबई, पुणे, नागपूर, अमरावती, नाशिक, औरंगाबाद यांना कळविण्यात येते की, त्यांनी संबंधीत संस्थाना आपल्या स्तरावर कळविण्यात यावे आणि जर असे कोणत्याही संस्था आढळल्यास तर त्या संस्थेवर आवश्यक कार्यवाही करुन अहवाल सादर करावा.

---

पृष्ठांकन क्रः-विकाअ/शिक्षण/अल्पसंख्यांक/२०१६/3535
सहसंचालक, तंत्रशिक्षण वि.का.अमरावती.
दिनांक 2 4 NOV 2016

प्र. सहसंचालक तंत्रशिक्षण
अमरावती.

प्रत :-

१) प्राचार्य, सर्व पदविका, पदवी व पदव्युत्तर पदवी संस्था, अमरावती विभाग, अमरावती यांना कळविण्यात येते की, वरील पत्रात दिलेल्या सुचनेप्रमाणे आवश्यक कार्यवाही करावी याची संबंधीतानी नोद घ्यावी.

२) प्रोग्रामर, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, अमरावती यांना संकेतस्थळावर टाकण्याकरीता.